ePaper

|| वर्ष - 8 | अंक - 26 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 31 जुलै 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## "उद्धव ठाकरेंनी मराठा आरक्षणाबाबत घेतलेली भूमिका दुर्दैवी": प्रकाश आंबेडकर



## आतील पानांत


- भारताच्या हॉकी संघाचे पुढचे पाऊल
- पदकतालिकेत चीन अव्वल स्थानी
- करीना-सैफमुळे सारा होती खूश
- जितेंद्र यांनी खरेदी केली लक्झरी कार


## मावळ' कुणाचा? बाळा भेगडेंना शेळकेंनी सांगितला 'बेसिक फॉर्म्युला'

# ज्याचा आमदार, त्यांची जागा!

### मावळ विधानसभेच्या जागेवर पत्रकार परिषद घेऊन भाजने ठोकला दावा

**। पुणे । महाईन्यूज**

**विधानसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच महायुतीत जागा वाटपावरुन वाद होण्याचे चित्र आहे. मावळ विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि भाजपमध्ये 'मावळ'कुणाचा यावरुन रस्सीखेच सुरु आहे. मावळ विधानसभा मतदारसंघ मिळवण्यासाठी भाजप ॲक्शन मोडवर आला आहे. महायुतीमध्ये ही जागा राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे आहे. यावर पत्रकार परिषद घेऊन भाजपने दावा ठोकला आहे. ही जागा कमळाच्या चिन्हावर लढवण्यासाठी आग्रह धरला आहे. आता मावळ विधानसभेवरून महायुतीत तिढा निर्माण होणार, हे उघड आहे. मावळ मतदारसंघ भाजपला मिळावा, यासाठी पक्षश्रेष्ठींकडे पाठपुरावा करणार असल्याचे माजी राज्यमंत्री बाळा भेगडे यांनी सांगितले.**



पवार गटाचे सुनील शेळके हे मावळचे आमदार आहे. त्यामुळे विद्यमान आमदाराला उमेदवारी मिळणार, हे जवळपास ठरले असतानाच भेगडे यांनी मतदारसंघावर दावा ठोकल्यामुळे 'मावळ'कोण लढवणार, यावर सध्या चर्चा सुरु आहे. सुनील शेळके यांनी त्याला उत्तर दिले आहे.

अजित पवार गटाच्या मावळ विधानसभेवर भाजप दावा करत असेल आणि हा दावा करताना राष्ट्रवादीच्या मावळ लोकसभेतील प्रचाराबाबत कोणी शंका घेत असेल तर हे योग्य नाही. असे म्हणत अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळकेंनी भाजपवर नाराजी व्यक्त केली. त्यांनी भाजप नेत्यांना जागा वाटपाच्या बेसिक फॉर्म्युला काय आहे, याची आठवण करुन दिली आहे.

### शेळके यांच्याविरोधात भेगडेंनी थोपटले दंड

ज्या पक्षाचा आमदार, त्याच पक्षाचा वाट्याला ती विधानसभा, असा बेसिक फॉर्म्युला महायुतीत ठरला आहे, असे असताना भाजपचे माजी राज्यमंत्री बाळा भेगडेंनी मावळ विधानसभेचा पुढचा आमदार कमळाच्या चिन्हावर निवडून येईल, असा दावा केला आहे. 2 ऑगस्टला मावळात मेळाव्याचे आयोजन केले. मात्र महायुतीचे प्रमुख मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री याबाबत निर्णय घेणार आहेत. मावळ लोकसभेत राष्ट्रवादीने महायुतीचा धर्म पाळला आहे. त्यावर शंका घेत भाजप धरलेला हा आग्रह अयोग्य असल्याचे शेळके यांनी म्हटलं आहे

---

## दादा, स्वगृही परत या, कार्यकर्त्यांनी घातली साद!

### शिरूर लोकसभेचे महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांचा शिंदे गटात प्रवेश

**। चाकण । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

लोकसभेच्या निवडणुकीत शिरुर लोकसभा मतदारसंघातून माजी खासदार आढळराव पाटील यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून निवडणूक लढविली होती. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्यातील अनेक भागातील महायुतीच्या उमेदवारांना पराभवाचा धक्का सहन करावा लागला. त्यातच आता विधानसभा निवडणूक तोंडावर आली आहे.

या निवडणुकीत याचा फटका बसू नये, यासाठी इतर पक्षात गेलेल्या नेत्यांना पुन्हा आपल्या पक्षात येण्याची साद घालण्यास कार्यकर्त्यांनी सुरुवात केली आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनाही अशीच काही साद त्यांच्या कार्यकर्त्यांकडून घालण्यात आली आहे. शिवसेनेत फूट पडल्यानंतर माजी खासदार असलेल्या शिवाजीराव आढळराव पाटील यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर जाणे पसंत केले. नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत शिरुर लोकसभा मतदारसंघातून माजी खासदार आढळराव पाटील यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून निवडणूक लढविली होती. निवडणुकीच्या अगोदर काही दिवस आढळरावांनी शिंदे यांच्या शिवसेनेतून राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला होता. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. शिवाजीराव आढळराव पाटील यांनी परत शिवसेनेत यावं अशी विनंती केली आहे. लांडेवाडी येथे झालेल्या आढळराव पाटील यांच्या जनता दरबारावेळी ही विनंती करण्यात आली. शिवसेना शिंदे गटाचे हवेली तालुका अध्यक्ष विपुल शितोळे यांनी ही विनंती आढळराव पाटील यांना केली. कार्यकर्त्यांनी केलेल्या या विनंतीमुळे माजी खासदार आढळराव आता अजितदादांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसला रामराम करत पुन्हा स्वगृही जाणार का? याची चर्चा आता सुरू झाली आहे.



### दादा आम्हाला तुमची गरज आहे

जनता दरबारामध्ये शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी त्यांना परत पक्षात येण्याची विनंती केली. दादा आम्हाला तुमची गरज आहे, परत या अशी साद आढळराव पाटील यांना घालण्यात आली. कार्यकर्त्यांचं यावेळचे प्रेम पाहून आढळराव पाटील देखील भारावून गेले होते. अजित पवार यांच्याकडून राष्ट्रवादी कॉंग्रेच्या घड्याळ चिन्हावर आढळरावांनी शिरूर लोकसभेची निवडणूक लढविली होती. मात्र त्यांच्या विरोधात निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार डॉ.अमोल कोल्हे यांनी त्यांचा मोठा पराभव केला. कोल्हे यांनी तब्बल 70 हजारांच्या मताधिक्याने शिवाजीराव आढळराव पाटील यांचा पराभव केला.

# पूजा खेडकर यांना 'कारणे दाखवा' नोटीस

## पोलिसांनी समन्स बजावूनही खेडकर हजर झाल्या नाहीत




। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) वादग्रस्त प्रशिक्षणार्थी पूजा खेडकर यांना केंद्र शासनाच्या कर्मचारी आणि प्रशिक्षण विभागाकडून (डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल अँड ट्रेनिंग) कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. खेडकर यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांबाबत त्यांनी येत्या २ ऑगस्टपर्यंत लेखी खुलासा करावा, असे आदेश खेडकर यांना देण्यात आले आहेत.**

प्रशिक्षणार्थी असताना खेडकर यांनी खासगी आलिशान मोटारीला अंबर दिवा लावला. मोटारीवर महाराष्ट्र शासन अशी पाटी लावली. त्यांनी बैठकीसाठी स्वतंत्र दालन घेतले. खेडकर यांच्या बडेजावपणाचे प्रकार उघडकीस आल्यावर जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांनी तक्रार केली. या प्रकरणाचा अहवाल जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी राज्य सरकारकडे पाठविला. खेडकर यांच्यावर असलेल्या आरोपाबाबत लेखी खुलासा करण्यात यावा, असे आदेश केंद्रशासनाच्या कर्मचारी आणि प्रशिक्षण विभागाने (डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल अँड ट्रेनिंग) दिले आहेत. याबाबत खेडकर यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. याबाबत त्यांनी समक्ष येऊन लेखी खुलासा करावा, असे नोटिशीत नमूद करण्यात आले आहे.दरम्यान, खेडकर यांची प्रशिक्षणार्थी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयात नियुक्ती करण्यात आली होती. या कालावधीत जिल्हाधिकारी दिवसे यांनी छळ केल्याचा आरोप खेडकर यांनी केला. खेडकर यांनी वाशीम पोलिसांकडे तक्रार दिली होती. हे प्रकरण पुण्यात घडल्याने वाशीम पोलिसांनी पुणे पोलिसांकडे चौकशी सोपविली. खेडकर यांनी पुण्यात येऊन जबाब नोंदवावा, असे समन्स पोलिसांनी बजावले होते. पुणे पोलिसांनी तीनदा समन्स बजावूनही खेडकर हजर झाल्या नाहीत.मुळशीतील शेतकऱ्याला पिस्तुलाचा धाक दाखविल्याप्रकरणी येरवडा कारागृहात असलेल्या मनोरमा खेडकर यांच्या जामीन अर्जावर गुरुवारी (१ ऑगस्ट) सुनावणी होणार आहे. शेतकऱ्याला पिस्तुलाचा धाक दाखविल्याप्रकरणी प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांची आई मनोरमा, वडील दिलीप यांच्यासह सात जणांविरुद्ध पौड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर पसार झालेल्या मनोरमा यांना ग्रामीण पोलिसांच्या पथकाने महाड परिसरातून अटक केली. दिलीप यांना नुकताच जामीन मंजूर करण्यात आला. मनोरमा यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली असून, सध्या त्या येरवडा कारागृहात आहेत. या गुन्ह्यात जामीन मिळवण्यासाठी मनोरमा यांनी त्यांच्या वकिलांमार्फत अर्ज केला होता. त्यांच्या जामीन अर्जावर सोमवारी सुनावणी होती. मात्र, काही कारणास्तव सुनावणी झाली नाही. खेडकर यांच्या जामीन अर्जावर गुरुवारी सुनावणी होणार आहे.डकर यांनी खासगी आलिशान मोटारीला अंबर दिवा लावला. मोटारीवर महाराष्ट्र शासन अशी पाटी लावली. त्यांनी बैठकीसाठी स्वतंत्र दालन घेतले. खेडकर यांच्या बडेजावपणाचे प्रकार उघडकीस आल्यावर जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांनी तक्रार केली.सुहास दिवसे यांनी राज्य सरकारकडे पाठविला. खेडकर यांच्यावर असलेल्या आरोपाबाबत लेखी खुलासा करण्यात यावा, असे आदेश केंद्रशासनाच्या कर्मचारी आणि प्रशिक्षण विभागाने (डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल अँड ट्रेनिंग) दिले आहेत.

### पुणे पोलिसांकडे चौकशी सोपविली

याबाबत खेडकर यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. याबाबत त्यांनी समक्ष येऊन लेखी खुलासा करावा, असे नोटिशीत नमूद करण्यात आले आहे.दरम्यान, खेडकर यांची प्रशिक्षणार्थी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयात नियुक्ती करण्यात आली होती. या कालावधीत जिल्हाधिकारी दिवसे यांनी छळ केल्याचा आरोप खेडकर यांनी केलाहे प्रकरण पुण्यात घडल्याने वाशीम पोलिसांनी पुणे पोलिसांकडे चौकशी सोपविली.

# पुण्यात पुरानंतर आजारांचा धोका!

## जलजन्यसह कीटकजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची चिन्हे



।पुणे।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरात पावसामुळे काही भागांत पूर आला होता. पुराच्या पाण्यामुळे या भागांमध्ये जलजन्य आजारांसह कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याचा धोका आहे. पावसामुळे साथरोगांचा प्रसार वाढलेला असतानाच आता पुरामुळे त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.**

या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आरोग्य विभागाने पूरग्रस्त भागात प्रतिबंधात्मक उपाययोजना हाती घेतल्या आहेत.शहरात प्रामुख्याने सिंहगड रस्त्यावरील नदीकाठच्या भागात पूरस्थिती निर्माण झाली होती. खडकवासला धरणातून विसर्ग वाढविण्यात आल्याने अनेक घरांमध्ये पुराचे पाणी घुसले होते. आता पुराचे पाणी ओसरले असले तरी पूरग्रस्त भागांत अनेक ठिकाणी पाणी साचले असून, राडारोडाही पसरलेला आहे. या भागात जलजन्य आणि कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. या महिन्यात शहरात डेंग्यूची रुग्णसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून, झिका आणि चिकुनगुनियाचे रुग्णही वाढत आहेत. आता या रुग्णसंख्येत आणखी भर पडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आरोग्यप्रमुख डॉ. निना बोराडे यांनी उपआरोग्य अधिकारी डॉ. कल्पना बळीवंत, सहायक आरोग्य अधिकारी डॉ. संजीव वावरे व डॉ. सूर्यकांत देवकर यांच्यासोबत पूरग्रस्त भागाची पाहणी केली. आरोग्यप्रमुखांनी सर्व सहायक आरोग्य अधिकारी, परिमंडळ व क्षेत्रीय वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेतशिवाजीनगरमधील पाटील इस्टेट, पुलाची वाडी, कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालयातील मंगळवार पेठ, भीमनगर परिसर.

### प्रतिबंधात्मक उपाययोजना

डेंग्यू, चिकुनगुनिया, हिवताप यांसारख्या आजाराचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी या भागामध्ये डासांची पैदास होऊ नये, यासाठी औषध फवारणी करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे डासांचे प्रमाण जास्त असलेल्या ठिकाणी धूरफवारणी करण्यात आली आहे. जलजन्य आजारांचा प्रसार होऊ नये यासाठी पिण्याचे पाणी निर्जंतुक करण्यासाठी मेडीक्लोर औषधाच्या बाटल्यांचे वाटप सुरू आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये महापालिका उभारणार

# संविधान भवन व विपश्यना केंद्र!

### मनपा शाळांमधील विद्यार्थी गिरवणार नाट्य अभिनयाचे धडे

। पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहरात संविधान भवन व विपश्यना केंद्र उभारण्यासाठीच्या विषयास प्रशासक शेखर सिंह यांनी आज मान्यता दिली आहे. या भवनाच्या उभारणीसाठी आवश्यक २०० कोटी रुपये रक्कमेच्या तरतुदीसह विविध विषयांना त्यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे.**



महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेले विविध विषय आज प्रशासक शेखर सिंह यांच्या मान्यतेसाठी विशेष बैठकीमध्ये ठेवण्यात आले होते. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये पार पडलेल्या बैठकीमध्ये प्रशासक सिंह यांनी या विषयांना मंजुरी दिली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त तथा नगरसचिव चंद्रकांत इंदलकर तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते. अनेक दिवसांपासून संविधान भवन व विपश्यना केंद्र उभारण्याची मागणी शहरातील नागरिकांच्या वतीने महापालिकेकडे करण्यात येत होती. या मागणीस अनुसरून संविधान भवन आणि विपश्यना केंद्र उभारणीसाठी २०० कोटी रुपये रकमेच्या तरतुदीस प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली आहे. त्यामुळे संविधान भवन व विपश्यना केंद्राबाबतची नागरिकांची प्रतीक्षा आता संपली आहे.

#### महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थी गिरवणार नाट्य अभिनयाचे धडे

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमिक विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता नाट्य प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येणार असुन याबाबतच्या विषयास प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे. त्यानुसार महापालिकेच्या ५ शाळांमध्ये हे नाट्य प्रशिक्षण वर्ग भरविण्यात येणार आहेत. माध्यमिक विद्यालय नेहरूनगर, माध्यमिक विद्यालय रुपीनगर, माध्यमिक विद्यालय थेरगाव, माध्यमिक विद्यालय वाकड आणि माध्यमिक विद्यालय निगडी या विद्यालयांमधील १२५ विद्यार्थ्यांना प्रभाकर पवार नाट्य कंपनी यांच्याद्वारे नाट्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या नाट्य वर्गांमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रंगमंचावर तालीम आणि सराव करण्याची संधी देखील महापालिकेच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

#### बैठकीत मंजूर विषय

महापालिकेच्या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजन लागू करणे, पिंपळे गुरव येथे आरक्षण क्र.३४७ बहुउद्देशीय इमारत व क्रीडांगण विकसित करणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय आणि कै. ह.भ.प.प्रभाकर मल्हारराव कुटे स्मृती रुग्णालयात रुग्ण सेवेच्या दृष्टीने आवश्यक असलेले विविध उपकरणे खरेदी करणे, विविध भागातील रस्ते, नाले, प्रकल्प तसेच शहरात विविध ठिकाणच्या देखभाल व दुरुस्तीच्या विषयास प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली.

---

## घरफोडीच्या पैशांतून मध्य प्रदेशातून खरेदी केल्या पिस्तुल

### दुचाकीवरून पिस्तुल हवेत फिरवून दहशत पसरवल्याप्रकरणी गुन्हा दाखल

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**दुचाकीवरून जाताना पिस्तुल हवेत फिरवून दहशत पसरवल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर घरफोड्या केल्या. त्यातून मिळालेल्या पैशांचा वापर करून मध्य प्रदेशात जाऊन पिस्तुल खरेदी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना गुन्हे शाखेच्या दरोडा विरोधी पथकाने अटक केली. त्यांच्याकडून सोन्या-चांदीचे दागिने, आठ दुचाकी, चार पिस्तुल, चार जिवंत काडतुसे आणि चार रिकाम्या पुंगळ्या असा १७ लाख ६२ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला.**




काही दिवसांपूर्वी चिखली परिसरात दुचाकीवरून जाताना पिस्तुल हवेत फिरवत 'रील्स' बनवून ते समाजमाध्यमातील इन्स्टाग्रामवर टाकल्याप्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले होते. त्यांचे इतर साथीदार फरार होते. दरम्यान, या गुन्ह्यातील आरोपी सुशील उर्फ बारक्या भरत गोरे (वय १८, रा. ओटास्कीम, निगडी) याने पिस्तुलाचा धाक दाखवून कपड्याच्या दुकानातून जबरदस्तीने कपडे चोरून नेले, काही ठिकाणी घरफोड्या केल्या होत्या. सुशील हा त्याचा साथीदार अक्षय प्रभाकर कणसे (वय २२) याच्यासोबत खेड तालुक्यातील कुरुळी येथे एका खोलीत राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सुशील आणि अक्षय या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून दोन पिस्तुल, दोन जिवंत काडतुसे आणि चार रिकाम्या पुंगळ्या पोलिसांनी जप्त केल्या. पोलिसांनी त्यांच्या दोन अल्पवयीन साथीदारांनाही ताब्यात घेऊन त्यांच्याकडून दोन पिस्तुल आणि दोन जिवंत काडतुसे जप्त केली.

सुशीलने त्याच्या साथीदारांसोबत मिळून पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरात जबरी चोरी, घरफोडी, मारामारी असे अनेक गुन्हे केल्याचे तपासात समोर आले. या कारवाईमुळे खडकवासला, पर्वती, हडपसर, भारती विद्यापीठ, कोंढवा, सिंहगड, विश्रामबाग, चिखली, भोसरी, एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यातील १४ गुन्हे उघडकीस आले आहेत. सुशील विरुद्ध खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, वाहन चोरी, जबरी चोरी, घरफोडी, वाहनांची तोडफोड असे एकूण २८ गुन्हे दाखल आहेत. तो सहकारनगर आणि चिखली पोलीस ठाण्यातील चार गुन्ह्यात फरार होता.

#### घरातच चार गोळ्या झाडल्या

सुशील याच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याने चिखली परिसरात घरफोड्या केल्या. घरफोड्यामधून मिळालेल्या पैशांमधून त्याने मध्य प्रदेश येथे जाऊन पिस्तुल विकत आणल्या. त्या पिस्तुल व्यवस्थित चालतात की नाही, हे पाहण्यासाठी त्याने त्याच्या घरातच चार गोळ्या झाडल्या.


# कौशल्ययुक्त शिक्षणाकडे झेप!



भूमिका

**अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी त्यांचा सलग सातवा अर्थसंकल्प सादर करून स्थापन केलेला विक्रम अभिनंदनास पात्र ठरतो; कारण सलग सात वर्षे मांडले गेलेल्या अर्थसंकल्पांमध्ये एक प्रकारचे सातत्य दिसते. त्याचे प्रतिबिंब यंदाच्याही अर्थसंकल्पात पडलेले दिसते.**

देशापुढील आव्हानांचाही विचार झालेला दिसेल. येत्या दहा वर्षांत होणारे औद्योगिक उत्पादन, त्याच्या गरजा ओळखून, युवकांना अर्थार्जन करण्याचे नवीन मार्ग त्यांनी उपलब्ध करून दिले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या उद्दिष्टांशीदेखील हा अर्थसंकल्प सुसंगत ठरतो, तो कसा हे पाहू. आज जर १४ ते १६ वयोगटातल्या युवकांचे कौशल्य बघितले तर आपल्याला आश्चर्य व वाईटही वाटेल. सन २०२३ चा 'असर' (ॲन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन रिपोर्ट) अहवाल सांगतो की, या वयोगटातील युवकांना इयत्ता दुसरीच्या मुलांकडून जे वाचणे अपेक्षित असते तेसुद्धा वाचता येत नाही. याचा अर्थ असा की, त्यांना एक तर त्यात गती नाही किंवा त्यांना ते ज्ञान उपयोगी वाटत नाही. त्यामुळे त्यांचा कल प्रत्यक्ष रोजगार मिळवून देईल अशा शिक्षणाकडे आहे. त्यांना प्रत्यक्ष रोजगार मिळवून देणाऱ्या कौशल्यआधारित शिक्षणाकडे जावेसे वाटते. हे ओळखून व तीच देशाची गरज आहे हे पाहून अर्थसंकल्पात यंदा जी १.४८ लाख कोटींची



तरतूद आहे. त्यात देशभरातील २० लाख युवकांना येत्या पाच वर्षांत कुशल करण्यासाठी १००० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना बळकट करण्याचा व त्यासाठी अर्थपुरवठा करण्याचा मानस निश्चितच स्वागतार्ह आहे. त्याचे दुसरे परिमाण असे की, देशाच्या औद्योगिक गरजा लक्षात घेऊन कौशल्य प्रशिक्षण देण्याचे काम या औद्योगिक प्रशिक्षण संस्था करणार आहेत. त्याने बेरोजगारी वर आणि देशाच्या कौशल्य समस्यांवर ('स्किल क्रायसिस'वर) उपाय मिळण्यास निश्चित मदत होईल. दुसरी महत्त्वाची तरतूद म्हणजे कौशल्य अर्जित करणाऱ्या आणि शिकाऊ उमेदवारांना सरकार भरघोस विद्यावेतन देणार आहे. त्यासाठी नियोक्ता व कर्मचारी या दोघांनाही सरकार मदत करणार आहे. त्यात सामाजिक सुरक्षासुद्धा अंतर्भूत राहणार आहे. नियोक्त्याला त्यांनी भरलेल्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमेच्या प्रमाणात अनुदान मिळणार आहे. एक कोटी तरुणांना देशातल्या ५०० प्रमुख उद्योगांमध्ये अंतर्वासिता (इंटर्नशिप) देण्याची व त्यांना दरमहा रु. ५००० व एकरकमी रु. ६००० देण्याची तरतूदसुद्धा युवकांच्या बदलत्या आकांक्षा लक्षात घेता योग्य आहे असे वाटते. असर २०२३ चा अहवाल सांगतो की, महाविद्यालयीन स्तरावरच्या १६.२ टक्के मुलांचा, कमी मुदतीचे म्हणजे सहा महिन्यांचे अभ्यासक्रम पूर्ण करण्याकडे कल आहे. अर्थसंकल्पातील या तरतुदीचा अशा युवकांना निश्चितच फायदा होईल असे वाटते. महत्त्वाचे म्हणजे या अभ्यासक्रमांसाठी लागणारे शिक्षण शुल्क भरण्यासाठी सरकारने दरवर्षी २५ हजार विद्यार्थ्यांसाठी प्रति वर्ष साडेसात लाख रु.पर्यंतच्या कर्जाची तरतूद केली आहे. तसेच ज्यांना उच्च शिक्षण घ्यायचे आहे त्यांच्यासाठी भारतीय संस्थांत प्रवेश घेतल्यास १० लाख रु. इतक्या कर्जाची सोय दरवर्षी एक लाख विद्यार्थ्यांसाठी केली आहे. यामुळे ज्यांना कौशल्य अर्जित करून लगेच उत्पन्न कमवायचे आहे त्यांची, तसेच ज्यांना उच्च शिक्षित व्हायचे आहे त्यांची, अशा दोघांचीही सोय झाली आहे असे वाटते. दुसरे म्हणजे, उद्योगांनासुद्धा कमी कौशल्याचे तसेच अधिक कौशल्याचे अशा दोन्ही गटांत मनुष्यबळ उपलब्ध होऊ शकेल अशी अपेक्षा आहे. प्रधानमंत्री पोषण आहार योजना' वाढवून त्यासाठी केलेल्या तरतुदीचे महत्त्व देशाच्या शहरी व समृद्ध भागांतील लोकांना कदाचित समजणार नाही. परंतु गडचिरोली अथवा तत्सम भागांतील रहिवाशांसाठी याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. घरातील एक व्यक्ती शाळेत जाणे म्हणजे दोन कमावते हात कमी होणे होय. त्यामुळे पालक त्यांना शाळेत घालत नाहीत किंवा शाळेतून काढून घेतात. मुले शाळाबाह्य होतात. भुकेचा प्रश्न मिटल्यास पालक त्यांना शाळेत जाऊ देण्यास तयार होतात असा अनुभव आहे. अर्थसंकल्पातील प्रधानमंत्री पोषण आहार योजनेसाठीची १२,४६७ कोटी रुपयांची तरतूद मागील तरतुदीपेक्षा ८६७ कोटी रुपयांनी जास्त असणे अतिशय आश्वासक आहे.

## प्रासंगिक »

### पोपटपंची!

***'विकसित भारत' घडवण्यासाठी भारतीयांचे दरडोई वार्षिक उत्पन्न १८ हजार डॉलर हवे, हे निती आयोगातील तज्ज्ञांस कळते; त्यावरील उपायही त्यांना माहीत असावेत...***

निती आयोगाची गेल्या आठवड्यातील बैठक १० मुख्यमंत्र्यांनी तिकडे पाठ फिरवल्यामुळे गाजली. देशातील ३५ पैकी १० राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी या पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील बैठकीला उपस्थित राहणे टाळले. म्हणजे जवळपास एकतृतीयांश राज्यांचे प्रतिनिधी या बैठकीस गेले नाहीत. यात तमिळनाडू, कर्नाटक, केरळ आदी नऊ राज्यांचा समावेश आहे आणि आश्चर्याची बाब म्हणजे केंद्र सरकारच्या स्थैर्यासाठी आवश्यक अशा बिहार राज्याचे नितीश कुमार यांचाही अनुपस्थितांत समावेश आहे. पश्चिम बंगालच्या ममता बॅनर्जी गेल्या खऱ्या! पण आपणास बोलू दिले जात नाही, असा आरोप आणि नंतर थयथयाट करत त्यांनी सभात्याग केला. जे झाले त्यावर आपापल्या बौद्धिक मगदुराप्रमाणे आणि राजकीय विचारबंधाप्रमाणे विश्लेषण केले जाईल आणि त्याप्रमाणे कोण निर्दोष, कोणाचा दोष इत्यादी प्रमाणपत्रे दिली जातील. पण या विश्लेषणात जाण्यात अर्थ नाही.

विजिगीषु वृत्ती तसंच 'मूरच्या नियमा'बरहुकूम चिपची कार्यक्षमता वाढवण्यासाठी केलेले अविरत प्रयत्न, सेमीकंडक्टर उद्योगाच्या वाढीला पुनश्च चालना देण्यासाठी शासकीय स्तरावर घेतले गेलेले धोरणात्मक निर्णय या सर्वांचा एकत्रितपणे परिपाक अमेरिकेच्या चिप क्षेत्रातील पुनरुत्थानात झाला.

# शीतयुद्ध-समाप्तीमागे सेमीकंडक्टर तंत्रज्ञान

याच कालखंडात भूराजकीय परिप्रेक्ष्यातही पुष्कळ घडामोडी होत होत्या. अमेरिका, पश्चिम युरोप, आग्नेय आशियाई देशांच्या समाजवादी किंवा भांडवलशाही पद्धतीनंपण लोकशाही मार्गानं होत असलेल्या आर्थिक भरभराटीमुळे जगभरातली साम्यवादाची लाट ओसरत चालली होती. नोव्हेंबर १९८९ मध्ये बर्लिन भिंत पडल्यानंतर व पुढे डिसेंबर १९९१ मध्ये तत्कालीन सोव्हिएत रशियाचे विघटन झाल्यानंतर जवळपास चार दशकं अमेरिका विरुद्ध सोव्हिएत रशिया आणि त्यांच्या त्यांच्या सहयोगी देशांमध्ये सुरू असलेल्या शीतयुद्धाची अंतिम घटका जवळ आली होती. शीतयुद्धाच्या समाप्तीला आणि (जरी कोणी अधिकृतरीत्या जाहीर केलं नसलं तरीही) त्यातल्या अमेरिकेच्या विजयाला कारणीभूत असलेल्या विविध घटकांतला अत्यंत महत्त्वाचा घटक हा सेमीकंडक्टर तंत्रज्ञान व निर्मितीत अमेरिकेने रशियावर वादातीतपणे घेतलेल्या आघाडीचा होता. जागतिक



इतिहासात मैलाचा दगड ठरलेल्या आणि भविष्यावर दूरगामी परिणाम करणाऱ्या या घटनेचं विश्लेषण करणं इथं समयोचित ठरावं. शीतयुद्धाच्या सुरुवातीच्या कालखंडात (१९४७ – १९६०) युद्धसज्जतेच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण असलेल्या विविध क्षेत्रांत रशियानं आघाडी घेतली होती. अंतराळ तंत्रज्ञान (पहिला उपग्रह आणि पहिला मानव अंतराळात पाठवणं), दूरवर असलेल्या लक्ष्याचा वेध घेण्याची क्षमता असलेली आंतरखंडीय क्षेपणास्त्रं, अणु-विघटनाच्या तंत्रज्ञानावर आधारित अण्वस्त्रं अशा बाबतीत रशियन तंत्रज्ञान अमेरिकेपेक्षा काकणभर सरसच होतं. १९६० नंतर मात्र यात बदल घडायला सुरुवात झाली. निर्वात नलिकांऐवजी सेमीकंडक्टर चिप तंत्रज्ञानाचा लष्करी शस्त्रागारांची अचूकता वाढवण्यासाठी तसंच त्यांच्या वेग व दिशेवर नियंत्रण ठेवण्यासाठी वापर वाढू लागला तर दुसऱ्या बाजूला अमेरिकी सेमीकंडक्टर कंपन्यांकडून चिपनिर्मिती घाऊक प्रमाणात होऊ लागली आणि इथंच रशियाची पीछेहाट सुरू झाली. वास्तविक रशियन नेतृत्वाला चिप तंत्रज्ञानाच्या संरक्षणसिद्धतेसाठी असलेल्या महत्त्वाची जाणीव तशी लवकरच झाली. १९६३ मध्येच रशियानं केवळ सेमीकंडक्टर क्षेत्रातल्या संशोधन आणि उत्पादनकार्यासाठी वाहून घेतलेल्या 'झेलेनोग्राड' या शहराची निर्मिती केली. होती की या शहरात उभारलेल्या कारखान्यांतून अत्याधुनिक चिपचं उत्पादन घेता येईल व लष्करी उपकरणांत आधुनिकतेच्या दृष्टीनं अमेरिकेच्या तोडीस तोड कामगिरी करता येईल. पण दुर्दैवानं झेलेनोग्राडला या अपेक्षा पूर्ण करण्यास साफ अपयश आलं. याची प्रामुख्याने दोन कारणं देता येतील.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# हा भांडण लावण्याचा प्रकार!

## ठाकरेंनी आरक्षणाबाबत घेतलेली भूमिका दुर्दैवी

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राज्यात आरक्षणासाठी लढणाऱ्या नेत्यांनी पंतप्रधान मोदींकडे जाऊन आरक्षणाची मर्यादा वाढवण्याची मागणी करावी, अशी भूमिका मंगळवारी उद्धव ठाकरे यांनी मांडली होती. त्यांच्या या भूमिकेवर आता वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी नाराजी व्यक्त केली आहे. उद्धव ठाकरेंनी मराठा आरक्षणाबाबत घेतलेली भूमिका दुर्दैवी असे ते म्हणाले.**



### ठाकरेंनी नेमकं काय म्हटलं होतं?

त्यामुळे सर्वच समाजाला पंतप्रधान मोदींकडे हा प्रश्न मांडावा लागेल. मी सर्व समाजाच्या लोकांना विनंती करतो, की त्यांनी राज्यात आरक्षणासाठी भांडण केल्यापेक्षा दिल्लीत जाऊन पंतप्रधान मोदींना यात लक्ष घालण्याची विनंती करावी, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली होती.त्यांच्या या भूमिकेवर आता वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी नाराजी व्यक्त केली आहे. उद्धव ठाकरेंनी मराठा आरक्षणाबाबत घेतलेली भूमिका दुर्दैवी असे ते म्हणाले.

प्रकाश आंबेडकर यांनी एक्स या समाज माध्यमावर व्हिडीओ पोस्ट करत यासंदर्भात भाष्य केलं आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मनोज जरांगे यांच्या मागणीबाबत उद्धव ठाकरेंनी मांडलेली भूमिका अतिशय दुर्दैवी आहे. मुळात उद्धव ठाकरे यांनी आपण या मागणीच्या बाजुने आहोत की विरोधात हे स्पष्ट न करता, पंतप्रधान मोदींकडे जाण्याचा सल्ला दिला आहे. याचा अर्थ ओबीसीतून आरक्षण मिळवण्यासाठी मोदींकडे जा, असं उद्धव ठाकरे सूचवत आहेत", अशी प्रतिक्रिया प्रकाश आंबेडकर यांनी दिली. पुढे बोलताना, "उद्धव ठाकरेंची ही भूमिका दोन समाजातील भांडण मिटवण्याऐवजी भांडणं लावण्याचा प्रकार आहे. यामुळे महाराष्ट्रातील शांतता भंग होऊ शकते", असेही ते म्हणाले.उद्धव ठाकरेंनी मंगळवारी मातोश्री या त्यांच्या निवास्थानी पत्रकारांशी संवाद साधला होता. यावेळी बोलताना त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली होती. यादरम्यान त्यांना मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याबाबत तुमची भूमिका काय? असा प्रश्न विचारण्यात आला होता. यासंदर्भात बोलताना, आरक्षणाच्याबाबतीत राजकीय नेत्यांच्या भूमिकेपेक्षा, सरकारने सर्व समाजाच्या नेत्यांना बोलवावं आणि सर्वमान्य तोडगा काढावा. शिवसेनेचा ( उद्धव ठाकरे गट ) त्याला पाठिंबा असेल", असं उद्धव ठाकरे म्हणाले होते.याशियाय "आरक्षणाचा प्रश्न राज्य सरकार सोडवू शकत नाही. त्यामुळे सर्वच समाजाला पंतप्रधान मोदींकडे हा प्रश्न मांडावा लागेल. मी सर्व समाजाच्या लोकांना विनंती करतो, की त्यांनी राज्यात आरक्षणासाठी भांडण केल्यापेक्षा दिल्लीत जाऊन पंतप्रधान मोदींना यात लक्ष घालण्याची विनंती करावी, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली होती.प्रकाश आंबेडकर यांनी एक्स या समाज माध्यमावर व्हिडीओ पोस्ट करत यासंदर्भात भाष्य केलं आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मनोज जरांगे यांच्या मागणीबाबत उद्धव ठाकरेंनी मांडलेली भूमिका अतिशय दुर्दैवी आहे. मुळात उद्धव ठाकरे यांनी आपण या मागणीच्या बाजुने आहोत की विरोधात हे स्पष्ट न करता, पंतप्रधान मोदींकडे जाण्याचा सल्ला दिला आहे. याचा अर्थ ओबीसीतून आरक्षण मिळवण्यासाठी मोदींकडे जा, असं उद्धव ठाकरे सूचवत आहेत", अशी प्रतिक्रिया प्रकाश आंबेडकर यांनी दिली. पुढे बोलताना, "उद्धव ठाकरेंची ही भूमिका दोन समाजातील भांडण मिटवण्याऐवजी भांडणं लावण्याचा प्रकार आहे. यामुळे महाराष्ट्रातील शांतता भंग होऊ शकते", असेही ते म्हणाले.उद्धव ठाकरेंनी मंगळवारी मातोश्री या त्यांच्या निवास्थानी पत्रकारांशी संवाद साधला होता. यावेळी बोलताना त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली होती. यादरम्यान त्यांना मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याबाबत तुमची भूमिका काय? असा प्रश्न विचारण्यात आला होता. यासंदर्भात बोलताना, आरक्षणाच्याबाबतीत राजकीय नेत्यांच्या भूमिकेपेक्षा, सरकारने सर्व समाजाच्या नेत्यांना बोलवावं आणि सर्वमान्य तोडगा काढावा. शिवसेनेचा ( उद्धव ठाकरे गट ) त्याला पाठिंबा असेल", असं उद्धव ठाकरे म्हणाले होते

# २० हजार तरुणांना रोजगार मिळण्याची शक्यता!

## राज्यात 81 हजार कोटी रूपयांच्या गुंतवणूक प्रकल्पांना मंजुरी

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रिमंडळाच्या उपसमितीची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील गुंतवणुकीबाबत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. मंत्रिमंडळाच्या उपसमितीने राज्यात ८१ हजार १३७ कोटी रूपयांच्या गुंतवणूक प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या प्रकल्पांद्वारे राज्यातील २० हजार तरुणांना रोजगार मिळल्याची शक्यत आहे. राज्य सरकारने परिपत्रक जारी करत यासंदर्भात माहिती दिली.**



### 5 हजार 200 पेक्षा अधिक रोजगार

या प्रकल्पामध्ये एकूण २७ हजार २०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. याद्वारे ५ हजार २०० पेक्षा अधिक रोजगार निर्मिती होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पामध्ये वार्षिक ५ लाख इलेक्ट्रीक प्रवासी कार व १ लाख व्यावसायिक कार निर्मितीचे नियोजन आहे. हिंदूस्थान कोका-कोला बेव्हरेज मार्फत फळाचा पल्प आणि रस यावर आधारित उत्पादन निर्मिती प्रकल्प : हा प्रकल्प रत्नागिरी येथे होणार आहे.महाराष्ट्रातला हा पहिलाच सेमीकंडक्टर निर्मिती करणारा प्रकल्प आहे. याप्रकल्पामध्ये प्रथम टप्यात १२ हजार कोटी रूपयांची गुंतवणूक होणार.

राज्य सरकारने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात गुंतवणुकदारांचा ओघ वाढत आहे. त्यानुसार ८१ हजार १३७ कोटी रूपये गुंतवणुकीच्या प्रकल्पांना आज उद्योग विभागाच्या मंत्रीमंडळ उपसमितीत मंजुरी देण्यात आली. यामध्ये उच्च तंत्रज्ञानावर आधारित लिथियम बॅटरी, इलेक्ट्रील व्हेईकल, सेमीकंडक्टर चिप, फळांचा पल्प निर्मिती या प्रकल्पांचा समावेश आहे. याप्रकल्पांद्वारे कोकणसह मराठवाडा, विदर्भ या भागात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणार आहे. त्यामुळे राज्यात सुमारे २० हजार तरुणांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार असल्याचे राज्य सरकारने म्हटलं आहेएनर्जी पीएसपी इलेव्हन लि. यांची लिथियम बॅटरी निर्मितीच्या प्रकल्पासाठी गुंतवणूक. याद्वारे ५ हजार पेक्षा अधिक रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे.इलेक्ट्रीक आणि हायब्रीड वाहन निर्मिती प्रकल्प : हा प्रकल्प छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

# वायनाडमध्ये भूस्खलन, 93 जणांचा मृत्यू!

## 4 तासांत 4 गावे वाहून गेली; केरळमध्ये 2 दिवस दुखवटा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**केरळमधील वायनाडमध्ये मुसळधार पावसामुळे सोमवारी रात्री उशिरा चार वेगवेगळ्या ठिकाणी भूस्खलन झाले. पहाटे 2 ते 6 च्या दरम्यान झालेल्या भूस्खलनात चार गावे वाहून गेली. मुंडक्काई, चुरामाला, अट्टामाला आणि नूलपुझा येथे घरे, पूल, रस्ते आणि वाहनेही वाहून गेली. आतापर्यंत 93 जणांचा मृत्यू झाला आहे. 116 रुग्णालयात आहेत, तर 400 हून अधिक लोक बेपत्ता आहेत. ही घटना रात्री उशिरा 2 वाजता घडली. बचावकार्यासाठी एसडीआरएफ आणि एनडीआरएफच्या टीम घटनास्थळी हजर आहेत. या घटनेनंतर केरळ सरकारने राज्यात दोन दिवसांचा राजकीय दुखवटा जाहीर केला आहे.**



कन्नूरमधील 225 लष्करी जवानांना वायनाडला पाठवण्यात आले आहे. बचावकार्यासाठी हवाई दलाचे दोन हेलिकॉप्टरही पाठवण्यात आले होते, मात्र पावसामुळे त्यांना कोझिकोडला परतावे लागले. वायनाड भूस्खलनानंतर आरोग्य विभागाने नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. तसेच आपत्कालीन आरोग्य सेवांसाठी 8086010833 आणि 9656938689 हे दोन हेल्पलाइन क्रमांक जारी केले आहेत. केरळच्या आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज यांनी सांगितले की, वैथिरी, कलपट्टा, मेप्पडी आणि मनंतवडी रुग्णालये सतर्क आहेत. कोझिकोड जिल्ह्यातील सर्व पर्यटन स्थळांना भेट देण्यास पर्यटकांना बंदी घालण्यात आली आहे. याशिवाय सर्व ग्रॅनाइट खाणी तात्पुरत्या स्वरूपात बंद ठेवण्यास सांगण्यात आले आहे. वायनाडमध्ये भूस्खलनात मृत्युमुखी पडलेल्या लोकांच्या मृत्यूबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. केरळ सरकारला केंद्राकडून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी दोन लाख रुपयांची भरपाई देण्याची घोषणा केली. जखमींना 50 हजार रुपये देण्यात येणार आहेत. वायनाडमधील मुंडक्काई, चुरमाला, अट्टामाला आणि नूलपुझा या चार गावांमध्ये भूस्खलन झाले आहे. पाच वर्षांपूर्वी 2019 मध्ये याच गावात अतिवृष्टीमुळे भूस्खलन झाले होते, ज्यामध्ये 17 लोकांचा मृत्यू झाला होता. 5 जणांचा अद्याप शोध लागला नव्हता. 52 घरे उद्ध्वस्त झाली होती. भूस्खलनामुळे वायनाडमधील मुंडक्काई गाव सर्वाधिक प्रभावित झाले आहे. बचाव पथक अद्याप येथे पोहोचू शकलेले नाही. एनडीआरएफचे एक पथक पायी चालत येथे पोहोचण्याचा प्रयत्न करत आहे. मुंडकाईमध्ये सुमारे 250 लोक अडकल्याचे वृत्त आहे. येथे अनेक घरे वाहून गेली आहेत. येथे 65 कुटुंबे राहत होती. जवळच्या चहा मळ्यातील 35 कर्मचारी बेपत्ता आहेत. वायनाड केरळच्या ईशान्येला आहे. केरळमधील हे एकमेव पठारी क्षेत्र आहे. म्हणजेच, माती, दगड आणि झाडे आणि झाडे उगवलेल्या मातीचे उंच आणि खालचे ढिगारे असलेले क्षेत्र. भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षणाच्या 2021 च्या अहवालानुसार, केरळमधील 43 टक्के क्षेत्र भूस्खलनाने प्रभावित झाले आहे. वायनाडची ५१ टक्के जमीन डोंगर उताराची आहे. म्हणजे भूस्खलनाची शक्यता खूप जास्त आहे. वायनाड पठार पश्चिम घाटात 700 ते 2100 मीटर उंचीवर आहे. मान्सूनची अरबी समुद्राची शाखा देशाच्या पश्चिम घाटावर आदळते आणि वर येते, त्यामुळे या भागात पावसाळ्यात भरपूर पाऊस पडतो. काबिनी नदी वायनाडमध्ये आहे. तिची उपनदी मनंथवाडी ही 'ठोंडारामुडी' शिखरावरून उगम पावते. भूस्खलनामुळे या नदीला पूर आल्याने मोठे नुकसान झाले आहे. कन्नूरमधील 225 लष्करी जवानांना वायनाडला पाठवण्यात आले आहे. बचावकार्यासाठी हवाई दलाचे दोन हेलिकॉप्टरही पाठवण्यात आले होते, मात्र पावसामुळे त्यांना कोझिकोडला परतावे लागले. वायनाड भूस्खलनानंतर आरोग्य विभागाने नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. तसेच आपत्कालीन आरोग्य सेवांसाठी 8086010833 आणि 9656938689 हे दोन हेल्पलाइन क्रमांक जारी केले आहेमनंतवडी रुग्णालये सतर्क आहेत. कोझिकोड जिल्ह्यातील सर्व पर्यटन स्थळांना भेट देण्यास पर्यटकांना बंदी घालण्यात आली आहे. याशिवाय सर्व ग्रॅनाइट खाणी तात्पुरत्या स्वरूपात बंद ठेवण्यास सांगण्यात आले आहे.

### भूस्खलनाचे कारण काय?

वायनाडमध्ये भूस्खलनात मृत्युमुखी पडलेल्या लोकांच्या मृत्यूबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. केरळ सरकारला केंद्राकडून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी दोन लाख रुपयांची भरपाई देण्याची घोषणा केली. जखमींना 50 हजार रुपये देण्यात येणार आहेत. वायनाडमधील मुंडक्काई, चुरमाला, अट्टामाला आणि नूलपुझा या चार गावांमध्ये भूस्खलन झाले आहे. पाच वर्षांपूर्वी 2019 मध्ये याच गावात अतिवृष्टीमुळे भूस्खलन झाले होते, ज्यामध्ये 17 लोकांचा मृत्यू झाला होता. 5 जणांचा अद्याप शोध लागला नव्हता. 52 घरे उद्ध्वस्त झाली होती. भूस्खलनामुळे वायनाडमधील मुंडक्काई गाव सर्वाधिक प्रभावित झाले आहे. बचाव पथक अद्याप येथे पोहोचू शकलेले नाही.

# रेल्वे अपघात; 18 डबे रुळावरून घसरले!

## अपघातात 2 जणांचा मृत्यू झाला असून 20 जण जखमी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**झारखंडच्या चक्रधरपूरमध्ये आज (30 जुलै) सकाळी रेल्वे अपघात झाल्याची बातमी समोर आली आहे. या अपघातानंतर घटनास्थळी बचावकार्यास सुरुवात करण्यात आली आहे. या अपघातात 2 जणांचा मृत्यू झाला असून 20 जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.**



तर या अपघातात 2 जण गंभीर जखमी झाले असून 20 जणांना किरकोळ दुखापत झाली आहे. सर्व जखमींवर प्राथमिक उपचार करण्यात येत असल्याची माहिती रेल्वेकडून देण्यात आली आहे. अपघातस्थळावरून प्रवाशांना नेण्यासाठी रेल्वेने विशेष कोचिंग रेक आणि बसेसची व्यवस्था केली आहे.हावडा-सीएसएमटी एक्स्प्रेस, चक्रधरपूर विभागातील राजखरस्वान पश्चिम आऊटर आणि बारांबू दरम्यान रुळावरून घसरली. हावडा-सीएसएमटी एक्स्प्रेस रुळावरून घसरल्यानंतर रेल्वेने हेल्पलाइन क्रमांक जारी केले आहेत.अपघातानंतरचा व्हिडिओही समोर आला आहे. व्हिडिओमध्ये अपघातानंतर ट्रेनच्या बोगी एकावर एक चढताना दिसत आहेत. बोगी रुळावरून घसरल्याने प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये घबराट पसरली होती. या अपघातात दीडशेहून अधिक प्रवासी जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. अनेक प्रवासी घटनास्थळी मदतीची याचना करताना दिसले. सध्या एनडीआरएफसह इतर बचाव पथक घटनास्थळी पोहोचले असून बचावकार्य सुरू आहे.सरायकेला जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, दोन प्रवाशांचा मृत्यू झाला आहे.

### काही डबे एकमेकांवर आदळले

जखमी प्रवाशांना बसमधून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दोन दिवसांपूर्वी या मार्गावरील मालगाडी रुळावरून घसरल्याचे सांगण्यात आले. मेल एक्सप्रेस त्याच मालगाडीच्या डब्यांना धडकली आणि तिच्या 8-10 बोगी रुळावरून घसरल्या. वेगामुळे काही डबे एकमेकांवर आदळले तर काही डबे रस्त्याच्या कडेला उलटले.झारखंडच्या चक्रधरपूरमध्ये आज (30 जुलै) सकाळी रेल्वे अपघात झाल्याची बातमी समोर आली आहे. या अपघातात 2 जणांचा मृत्यू झाला असून 20 जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

# 20 वर्षांपासून वडिलांना भेटलेली नाही जिया



बिग बॉस OTT 2 चा ग्रँड फिनाले 14 ऑगस्ट रोजी होणार आहे. ग्रँड फिनालेच्या अवघ्या 4 दिवसांपूर्वी जिया शंकर शोमधून बाहेर पडली. जियाच्या एलिमिनेशनसोबतच, बिग बॉस ओटीटी 2 ला टॉप 5 फायनलिस्ट मिळाले आहेत. शोमधून बाहेर पडल्यानंतर मीडियाशी बोलताना जियाने तिच्या वडिलांबद्दल माहिती दिली. तिने सांगितले की, तिचे वडील तिला 20 वर्षांपासून तिला भेटले नाहीत, तिला त्यांची आठवण येते. याआधीही जियाने बिग बॉसच्या घरात तिच्या वडिलांचा अनेकदा उल्लेख केला आहे. एलिमिनेशनच्या आधीही तिने स्पर्धक एल्विश यादवला सांगितले की. तिचे वडील खूप दिवसांपासून भेटलेले नाहीत. दुसऱ्या लग्नापासून त्यांना एक मुलगी देखील आहे आणि ते त्यांच्या कुटुंबात आनंदी आहेत. जिया अशा क्षणांबद्दल उघडपणे बोलली जेव्हा तिला तिच्या वडिलांची सर्वात जास्त आठवण येते. ती म्हणाली- जेव्हा मी इतर कुटुंबांना एकत्र पाहते तेव्हा मला त्यांची आठवण येते. जेव्हा जेव्हा एखादी वृद्ध व्यक्ती मला काही बोलते आणि नंतर मी त्यांना काहीही बोलू शकत नाही तेव्हा अशा क्षणांमध्ये मला त्यांची आठवण येते. 'जेव्हा मी लहान होतो आणि कोणी मला काही बोलायचे, तेव्हा मी माझ्या वडिलांकडे धावत असे. मी त्यांच्याकडे जाऊन तक्रार करायचे, मग ते नेहमी माझी बाजू घेत असे. त्यांनी माझ्यावर खूप प्रेम केले, माझे संरक्षण केले. आता जेव्हा जेव्हा मला असुरक्षित किंवा अशक्त वाटते तेव्हा मला त्यांची खूप आठवण येते. एलिमिनेशनपूर्वीच जियाने शोचा स्पर्धक एल्विश यादवशी तिच्या वडिलांबद्दल बोलली होती. एल्विश आणि जिया दोघेही बागेच्या परिसरात फिरत होते. त्यावेळी जेव्हा एल्विशने जियाला विचारले की तिला वडिलांशी बोलणे आवडत नाही का? आम्ही एकमेकांशी बोलत नाही.

# इशिताने मुलाचे नाव वायु ठेवले

दृश्यम फेम अभिनेत्री इशिता दत्ता आणि वत्सल सेठ 19 जुलै रोजी आई-वडील झाले. इशिताने एका मुलाला जन्म दिला आहे. नुकतेच दोघांनीही आपल्या मुलाचे नाव ठेवले आहे. या सोहळ्याचा व्हिडिओ शेअर करत त्यांनी आपल्या मुलाचे नाव उघड केले आहे. वायुसेठ असे मुलाचे नाव आहे. इशिताने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये तो आपल्या मुलाचा कार्यक्रम पारंपारिक गुजराती विधी करताना दिसत आहे. व्हिडिओ शेअर करताना जोडप्याने त्यांच्या इंस्टाग्रामवर लिहिले, 'आमच्या लहान मुलाचा नामकरण समारंभ. वायु सेठ, सर्वांच्या प्रेम आणि आशीर्वादाबद्दल धन्यवाद. इशिता दत्ताने 2017 मध्ये बॉलिवूड अभिनेता वत्सल सेठसोबत मोठ्या थाटात लग्न केले. आता लग्नाला 5 वर्षे पूर्ण झाली असून हे जोडपे आई-वडील झाले आहेत. इशिता ही बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री तनुश्री दत्ताची बहीण



# करीना-सैफमुळे सारा होती खूश



सारा अली खान आज 28 वर्षांची झाली आहे. ती 5 वर्षांपासून चित्रपटसृष्टीत सक्रिय असून एकूण 7 चित्रपटांमध्ये तिने काम केले आहे. नवाब कुटुंबात जन्मलेली सारा आई-वडिलांना पाहून अभिनय क्षेत्रात आली. सुरुवातीच्या काळात कधी लठ्ठपणामुळे तर कधी अभिनयामुळे तिला ट्रोल व्हावे लागले. मात्र, कुटुंब आणि आत्मविश्वासाच्या बळावर ती पुढे जात राहिली. त्याच वेळी, ती नेहमीच करीना कपूरची मोठी चाहती होती. करिनाने आपल्या कुटुंबाचा भाग व्हावे अशी तिची इच्छा होती. सारा अली खानचा जन्म 12 ऑगस्ट 1995 रोजी मुंबईत पतौडी कुटुंबात झाला. वडील सैफ अली खान आणि आई अमृता सिंग हे दोघेही चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध चेहरे होते. साराही तिच्या आई-वडिलांना पाहून अभिनेत्री होण्याचे स्वप्न पाहायची. ती 4 वर्षांची झाल्यावर तिच्या आईने एका शाळेच्या मुख्याध्यापकांना प्रवेशासाठी कॉल केला. आईने मुख्याध्यापकासमोर साराचे खूप कौतुक केले आणि सांगितले की ती अभ्यासात खूप चांगली आहे. यावर मुख्याध्यापकांनी साराशी बोलायचे असल्याचे सांगितले. सैफ अली खान आणि अमृता सिंग यांचे नाते केवळ 13 वर्षे टिकले. यानंतर दोघांचा घटस्फोट झाला. त्याच वेळी, सारा 17 वर्षांची असताना सैफ अली खानने करीना कपूरसोबत दुसरे लग्न केले. साराला जेव्हा तिच्या वडिलांच्या दुसऱ्या लग्नाची माहिती मिळाली तेव्हा तिला खूप आनंद झाला. वास्तविक, जेव्हापासून साराने कभी खुशी कभी गम चित्रपट पाहिला तेव्हापासून ती करीना कपूरच्या व्यक्तिरेखेने खूप प्रभावित झाली होती. करीनाने कोणत्याही प्रकारे तिच्या कुटुंबाचा भाग व्हावे अशी तिची इच्छा होती. वडिलांच्या आयुष्यात दुसरं कुणीतरी प्रवेश करणार असल्याचं लग्नाच्या बातमीने तिला अजिबात वाईट वाटलं नाही. ही बातमी ऐकून ती आईकडे गेली आणि लग्नात काय घालू हे विचारू लागली. यावर अमृताने डिझायनरला बोलावून तिच्यासाठी सर्वात सुंदर ड्रेस डिझाईन करण्यास सांगितले. सैफ आणि करिनाच्या लग्नात तिने अनारकली सूट परिधान केला.

# जितेंद्र यांनी खरेदी केली लक्झरी कार

बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते जितेंद्र यांनी नुकतीच एक नवीन रेंज रोव्हर एसयूव्ही कार खरेदी केली आहे. बातमीनुसार, कारची किंमत करोडोंमध्ये आहे. दिग्गज अभिनेत्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे, ज्यामध्ये ते त्याच कारमधून शनी मंदिरात दर्शनासाठी आले होते. लोकप्रिय व्हिडिओमध्ये, जितेंद्र यांची कार शनी मंदिराबाहेर उभी होती, जिथे दर्शन घेण्यासाठी आले होते. येथे काही काळ थांबून त्यांनी दर्शन घेतले आणि नंतर आपल्या गाडीतून निघून गेले. आपल्या आवडत्या अभिनेत्याला पाहून मंदिरात आलेल्या लोकांनी जितेंद्रसोबत सेल्फी काढण्याची विनंती केली. त्यांना पाहताच मंदिराभोवती गर्दी झाली. अभिनेत्याने तेथे आलेल्या चाहत्यांसह छायाचित्रे क्लिक केली आणि त्यांचे आभार मानले. कार ब्लॉग इंडियाच्या रिपोर्टनुसार, जितेंद्रने रेंज रोव्हरची एसयूव्ही कार खरेदी केली आहे, ज्याची नवीनतम किंमत सुमारे 2.38 कोटी रुपये आहे. मात्र, कारची खरी किंमत काय आहे, याबाबत कोणतीही ठोस माहिती नाही.

# अमिताभ बच्चन यांच्याकडून सोशल मीडियावर झाली चूक

बॉलीवूडचे महानायक अमिताभ बच्चन त्यांच्या कामासह सोशल मीडियावरील पोस्टमुळे कायम चर्चेत असतात. इतर कलाकारांप्रमाणे अमिताभ बच्चनही सोशल मीडियावर सक्रिय असतात. कधी कोणत्या चित्रपटाचं, कलाकाराचं कौतुक करतात तर कधी चालू घडामोडींविषयी देखील भाष्य करतात. अलीकडेच बिग बी यांनी एक पोस्ट शेअर केली होती. पण या पोस्टमध्ये त्यांच्याकडून एक चूक झाली होती. या चुकीमुळे अमिताभ बच्चन यांनी चाहत्यांनी माफी मागितली आहे.अमिताभ बच्चन ( AMITABH BACHCHAN ) यांनी इन्स्टाग्रामवर स्वतःच्या चित्रपटातील एक व्हिडीओ शेअर केला होता. या व्हिडीओत ते धावताना दिसत होते. तसंच चित्रपटातील त्या व्हिडीओनंतर सध्याचा व्हिडीओ होता. ज्यामध्ये अमिताभ बच्चन गार्डनमध्ये धावताना पाहायला मिळाले. हा व्हिडीओ शेअर करत त्यांनी पहिला व्हिडीओ 'अग्निपथ' चित्रपटातील असल्याचं म्हटलं होतं.व्हिडीओ शेअर करत त्यांनी लिहिलं होतं, "'अग्निपथ' पासून ते आतापर्यंत धावतचं आहे. अजूनही 'अग्निपथ' (१९९०) पासून ते आतापर्यंत कामासाठी धावत आहे." पण शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये बिग बींचा जो धावतानाचा सीन होता, तो 'अग्निपथ' चित्रपटातील नाही तर 'अकेला' चित्रपटातील होता. ही चूक जेव्हा बिग बींच्या लक्षात आली तेव्हा त्यांनी चाहत्यांची माफी मागितली.अमिताभ बच्चन ( AMITABH BACHCHAN ) यांनी इन्स्टाग्राम स्टोरीवरून चाहत्यांची जाहीर माफी मागितली. ते म्हणाले, "माफ करा. 'अग्निपथ' संबंधित धावतानाची जी पोस्ट मी गेली होती, ती चुकीची होती. तो सीन 'अकेला' चित्रपटातील आहे. शुभचिंतकांचे आभार."दरम्यान, अमिताभ बच्चन ( AMITABH BACHCHAN ) यांच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, त्यांचा २७ जूनला 'कल्कि २८९८ एडी' (KALKI 2898 AD) चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात त्यांनी अश्वत्थामाची भूमिका साकारली होती. अमिताभ बच्चन यांनी साकारलेली ही भूमिका प्रेक्षकांच्या चांगलीच पसंतीस पडली. आता बिग बी 'कल्कि २८९८ एडी' चित्रपटाच्या पुढच्या भागात देखील झळकणार आहेत.

# भारताच्या हॉकी संघाचे पुढचे पाऊल!

## आयरलँडला गोल करण्यापासून रोखण्यात संघाला यश

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**पॅरिस ऑलिम्पिकमध्ये (PARIS OLYMPICS) चौथा दिवस भारतासाठी सकारात्मक ठरला आहे. नेमबाज मनू भाकर (MANU BHAKER)आणि सरबज्योत या दोघांनी मिश्र दुहेरी 10 मीटर एअर पिस्टल प्रकारात कांस्य पदक मिळवलं आहे मनू भाकरनं एकाच ऑलिम्पिकमध्ये दुसरं पदक मिळवण्याचा इतिहास रचला. स्वतंत्र भारतात एकाच ऑलिम्पिकमध्ये दोनदा पदक जिंकणारी ती पहिली खेळाडू ठरली आहे. या नंतर भारताला आणखी दोन गुड न्यूज पॅरिसमधून मिळाल्या.**



भारताच्या हॉकी (INDIAN HOCKEY TEAM) संघानं आयरलँडला 2-0 अशा फरकानं पराभूत केलं. भारताचा हा ऑलिम्पिकमधील तिसरा सामना होता. या सामन्यात कॅप्टन हरमनप्रीत सिंगनं (HARMANPREET SINGH) दोन गोल करत संघाला विजय मिळवून दिला. भारत हॉकीच्या ब गटात आहे. भारतीय हॉकी संघानं टोक्यो ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक जिंकलं होतं. यावेळी त्यांच्याकडून सुवर्ण किंवा रौप्य पदकाची आशा देशातील नागरिकांना आहे. त्या दिशेनं भारताच्या हॉकी संघाची वाटचाल सुरु आहे. भारतानं आज आयरलँडला 2-0 असं पराभूत केलं आहे. भारतानं सामन्यावर पूर्णपणे वर्चस्व ठेवलं. आयरलँडला गोल करण्यापासून रोखण्यात भारतीय संघाला यश आलं. अखेर भारतानं आयरलँडला2-0 अशा फरकानं पराभूत करत विजय मिळवला. भारतानं आयरलँड विरुद्ध एक गोल पेनल्टी स्ट्रोक आणि पेनल्टी कॉर्नरवर केला. भारताकडून दोन्ही गोल हरमनप्रीत सिंगनं केले. भारतानं पॅरिस ऑलिम्पिकमध्ये दोन सामने जिंकले आहेत. तर, एक सामना बरोबरीत सोडवण्यात संघाला यश आलं आहे. भारतानं पहिल्या मॅचमध्ये न्यूझीलंडला 3-2 असं पराभूत केलं होतं. त्यानंतर काल अर्जेंटिना विरुद्ध भारतीय संघ पराभवाच्या छायेत होता. मात्र, कॅप्टन हरमनप्रीत सिंगनं 58 व्या मिनिटाला गोल करत सामन्यात बरोबरी साधली. तर, आज झालेल्या मॅचमध्ये भारतानं आयरलँडला 2-0 असं पराभूत केलं. या विजयासह भारतीय हॉकी संघ 7 गुणांसह ब गटात पहिल्या स्थानावर पोहोचला आहे. अर्जेटिनानं न्यूजीलँडला पराभूत केल्यास भारताचं उपांत्यपूर्व फेरीतील स्थान निश्चित होईल.

भारताचे बॅडमिंटनपटू चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रेड्डी यांनी देखील इंडोनेशियाच्या संघाला पराभूत केलं आहे. चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रेड्डी यांनी 21-13 आणि 21-13 अशा फरकानं इंडोनेशियाच्या खेळाडूंना पराभूत केलं. दरम्यान, मनू भाकरनं भारताला दोन कांस्य पदक जिंकवून दिल्यानंतर अजून एक पदक ती जिंकवून देऊ शकते. 2 ऑगस्ट रोजी ती 25 मीटर एअर पिस्टल शुटिंगमध्ये सहभागी होईल. भारताच्या हॉकी (INDIAN HOCKEY TEAM) संघानं आयरलँडला 2-0 अशा फरकानं पराभूत केलं. भारताचा हा ऑलिम्पिकमधील तिसरा सामना होता. या सामन्यात कॅप्टन हरमनप्रीत सिंगनं दोन गोल करत संघाला विजय मिळवून दिला.

### 58 व्या मिनिटाला गोल

भारत हॉकीच्या ब गटात आहे. भारतीय हॉकी संघानं टोक्यो ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक जिंकलं होतं. यावेळी त्यांच्याकडून सुवर्ण किंवा रौप्य पदकाची आशा देशातील नागरिकांना आहे. त्या दिशेनं भारताच्या हॉकी संघाची वाटचाल सुरु आहे. भारतानं आज आयरलँडला 2-0 असं पराभूत केलं आहे. भारतानं सामन्यावर पूर्णपणे वर्चस्व ठेवलं. आयरलँडला गोल करण्यापासून रोखण्यात भारतीय संघाला यश आलं. अखेर भारतानं आयरलँडला2-0 अशा फरकानं पराभूत करत विजय मिळवला. भारतानं आयरलँड विरुद्ध एक गोल पेनल्टी स्ट्रोक आणि पेनल्टी कॉर्नरवर केला. भारताकडून दोन्ही गोल हरमनप्रीत सिंगनं केले. भारतानं पॅरिस ऑलिम्पिकमध्ये दोन सामने जिंकले आहेत. त्यानंतर काल अर्जेंटिना विरुद्ध भारतीय संघ पराभवाच्या छायेत होता. मात्र, कॅप्टन हरमनप्रीत सिंगनं 58 व्या मिनिटाला गोल करत सामन्यात बरोबरी साधली.

# ऑलिम्पिक : पदकतालिकेत चीन अव्वल स्थानी

## चीनने चौथ्या दिवशी सुवर्ण पदक जिंकत गुणतालिकेत झेप घेतली

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पॅरिसमध्ये सुरू असलेल्या ऑलिम्पिक २०२४ मध्ये एकापेक्षा एक जबरदस्त खेळ पाहायला मिळत आहेत. सर्वच देशांतील खेळाडू एकमेकांना तगडी टक्कर देत पदके जिंकून आपल्या देशाला गौरव मिळवून देण्याच्या प्रयत्नात करत आहेत. दरम्यान, आतापर्यंत तीन दिवसांचे खेळ झाले आहेत.**



तर चौथ्या दिवशीही अनेक देशांनी पदक पटकावले आहेत. पदकतालिकेत चीन आणि जपान हे देश अव्वल स्थानी आहेत. ऑलिम्पिकचे तीन दिवस पूर्ण झाल्यानंतर पदकतालिकेत जपान पहिल्या क्रमांकावर आहे. जपानने आतापर्यंत एकूण १२ पदके जिंकली असून त्यात ६ सुवर्ण, ३ रौप्य आणि ४ कांस्य पदकांचा समावेश आहे. तर यजमान देश फ्रान्स दुसऱ्या स्थानावर आहे. फ्रान्सने आतापर्यंत ५ सुवर्ण, ८ रौप्य आणि ३ कांस्यपदके जिंकली आहेत. म्हणजेच त्याच्या नावे एकूण १६ पदके आहेत. जपानकडे ६ सुवर्ण असल्याने ते पदकतालिकेत पहिल्या क्रमांकावर आहे. चीनबद्दल बोलायचे तर चीनने आतापर्यंत ५ सुवर्ण, ५ रौप्य आणि २ कांस्य पदके जिंकली आहेत. त्यांच्या एकूण पदकांची संख्या १२ पर्यंत आहे.तर चौथ्या दिवशी संध्याकाळी ७ वाजेपर्यंत गुणतालिका पाहता चीनने बाजी मारली आहे. चीनने चौथ्या दिवशी सुवर्ण पदक जिंकत गुणतालिकेत झेप घेतली आहे. तर जपान १२ पदकांसह दुसऱ्या स्थानी आहे. फ्रान्सचा संघ १६ गुणांसह तिसऱ्या स्थानी केवळ ५ सुवर्ण पदके आहेत. चौथ्या स्थानी ऑस्ट्रेलिया ५ सुवर्ण, ४ रौप्य यासह ९ पदके आहेत. पाचव्या स्थानी रिपब्लिक ऑफ कोरिया असून ५ सुवर्ण, ३ रौप्य आणि २ कांस्यपदकांसह एकूण १० पदके आहेत.

### आतापर्यंत तीन दिवसांचे खेळ

तर अमेरिकाचा संघ सर्वाधिक २० पदकांसह सहाव्या स्थानी आहे. अमेरिकेने सर्वाधिक रौप्य (८) व कांस्य (९) पदके जिंकली आहेत आणि ३ सुवर्ण पदके आतापर्यंत जिंकली आहेत.पॅरिस ऑलिम्पिक २०२४ च्या तुलनेत भारतीय संघ २ कांस्य पदकांसह २८व्या स्थानी आहे. भारताने ही दोन्ही पदके नेमबाजीत पटकावली आहेत. पहिले पदक मनू भाकेर या २२ वर्षीय नेमबाज महिला १० मी एअर पिस्तुल प्रकारात जिंकले. तर दुसरे कांस्य पदक मिक्स्ड १० मी एअर पिस्तुल प्रकारात मनू भाकेर आणि सरबज्योत सिंग यांनी पटकावले आहे. यासह मनू भाकेर ही एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणारी स्वतंत्र भारताची पहिली खेळाडू आहे. पॅरिसमध्ये सुरू असलेल्या ऑलिम्पिक २०२४ मध्ये एकापेक्षा एक जबरदस्त खेळ पाहायला मिळत आहेत. सर्वच देशांतील खेळाडू एकमेकांना तगडी टक्कर देत पदके जिंकून आपल्या देशाला गौरव मिळवून देण्याच्या प्रयत्नात करत आहेत. दरम्यान, आतापर्यंत तीन दिवसांचे खेळ झाले आहेत.